Cosmos Multidisciplinary Research E-Journal Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal Impact Factor 4.94 ISSN No. 2456-1665

# स्त्री जीवन, लिंगभेद आणि पुरूषसत्तेचं वर्चस्व

**यशवंत रघुनाथ कुलकर्णी**
संशोधक विद्यार्थी

**डॉ. जितेंद्र गिरासे**
संशोधन मार्गदर्शक
श्रीमती एन.एन.सी. कला, वाणिज्य
व विज्ञान महाविद्यालय,
कुसुंबा, जि. धुळे

आधुनिक विज्ञान युगात स्त्रिया खरोखरच सुरक्षित आहेत का? आजच्या वर्तमान परिस्थितीत बऱ्याचशा स्त्रिया नोकरी करीत असल्या तरी त्या आपल्या कुटुंबात स्वतंत्र आणि निर्भिड जीवन जगू शकतात का? स्वत: पगार कमविणारी स्त्री तिचा खर्च करण्यावर किंवा काही वस्तू खरेदी करण्यासाठी तिला स्वातंत्र्य आहे का? नोकरी करीत असताना समाजाची तिच्याकडे पाहण्याची दृष्टी कशी असू शकते. तिला स्त्री सहकाऱ्याकडून व पुरूष सहकाऱ्याकडून किती सहकार्य लाभतं असे अनेक प्रश्न तिच्या जीवनाभोवती पिंगा घालत असताना दिसतात. काही एकत्र कुटुंबामध्ये जर स्त्री नोकरी करीत असेल तर तिला तिच्या जावा किंवा नवऱ्याची बहीण अथवा सासू-सासरे-दीर यांच्याकडून कशी वागणूक मिळते? या प्रश्नाकडेही गांभीर्याने बघितले गेले पाहिजे.

अजूनही काही ग्रामीण भागात स्त्री नोकरी करीत असेल तर तिला काही सांस्कृतिक, सामाजिक, राजकीय, आर्थिक क्षेत्रात सहभाग घ्यायला पुरूषाची परवानगी घ्यावी लागते. एखादी स्त्री गावातील प्रमुख नागरिक किंवा सरपंच म्हणून काम करत असेल तर ती निमित्तमात्र असते. सर्व सरपंचाचे कार्य, निर्णय तिचा घरचा पुरूषच घेत असतो. ती आपली नावालाच सरपंच असते. प्रत्यक्ष कार्य मात्र तिचे पती करीत असतात. येथे लगेच लिंगभेदाची जाणीव लक्षात येते. प्रतिगामी विचाराच्या घरातील लोकांना वाटते की स्त्री ही पुरूषाचं काम करू शकत नाही, ते तिला शक्य नाही. सरपंचाचे काम पुरूषच करू शकेल हा भेद कशासाठी? मुळात आपण स्त्री करीत असलेल्या कार्यावर विश्वास टाकत नाही, ही मोठी अडचण असते. यातील मानसिकता कुठेतरी बदलली पाहिजे.

आधुनिक युगात बदलत्या जीवनशैलीमुळे समाजाच्या सर्वच क्षेत्रात अनेक बदल झालेले आपल्याला दिसतात. शिक्षणामुळे वंचितस्तर, शेतकरी, मजुरी करणाऱ्या स्त्रिया यांना देखील 'स्व' जाणीव हा आत्मभान आलेले दिसते. त्यामुळे अलीकडे शिकलेल्या स्त्रियांचा देखील स्वाभिमान जागृत झाल्याचे लक्षात येते. जागतिकीकरणामुळे सर्वत्र बदल झालेले दिसून येतात. ग्रामीण स्तर आणि शहरी स्तरावर स्त्रियांनी आता जागृत होण्याची वेळ आली आहे. पूर्वीपासून चालत आलेली पुरूषसत्ताक संस्कृती लोप पावताना दिसत आहे. महाराष्ट्रातील काही पुरोगामी

प्रदेश सोडला तर विदर्भातील गडचिरोलीचा आदिवासी पट्टा, मराठवाडा, खानदेशातील काही प्रदेश यात पुरूषसत्ता ही डोके वर काढताना दिसते.

काही कुटुंबांमध्ये सासू-सासरा आणि नवऱ्याकडून 'स्त्री' चा होणारा छळ, अत्याचार सुरू असल्याचे निदर्शनास येते. उलटपक्षी नोकरी करणाऱ्या 'स्त्री'चेच शोषण होताना दिसते. तिच्यावर विनाकारण संशय घेणे, खोटे आरोप करणे, माहेराहून बंगला बांधण्यासाठी अथवा 'फोरव्हिलर' घेण्यासाठी पैशांची मागणी करणे अशा स्वरूपात तिच्यावर दडपण आणून तिचा अनन्वीत/शारीरिक छळ करून पैसे काढण्याचा प्रयत्न केला जातो. या दृष्टीने स्त्री अत्याचार आणि हिंसाचाराच्या दृष्टीने कडक कायद्यांची अंमलबजावणी करण्याची खरी गरज आहे.

नोकरीच्या ठिकाणी स्त्रियांना जरी स्थान दिलेले असले तरी पुरूषी वर्चस्व असल्याचे लक्षात येते. शिक्षण क्षेत्रात, समाजकारणात, अर्थकारण, राजकारण अशा बऱ्याच क्षेत्रात स्त्रियांची कामगिरी आणि त्यांचे कार्यकर्तृत्व वाखाणण्यासारखे असते. असे जरी असले तरी पुरूषसत्ताक संस्कृतीमध्ये स्त्रीला गौण स्थान दिले जाते. अर्थात या लिगभेदामुळे तिला पाहिजे तेवढे स्वातंत्र्य मिळत नाही. उच्च शिक्षण घेऊन देखील तिला कष्टाचे जीवन जगावे लागते. अन्याय, अत्याचाराला बळी पडावे लागते आणि मग प्रश्न पडतो की भारतीय संस्कृतीत स्त्रियांची अजूनही काय अवस्था आहे? हा प्रश्न सारखा सुत्र माणसाच्या मनात अस्वस्थ करतो. हा स्त्रियांवरील लिंगभेदानुसार होणाऱ्या अन्यायावर स्त्रीवादी चळवळीने संघर्ष करण्यासाठी कंबर कसली आहे. यासंदर्भात स्त्रीवादी चळवळीच्या कार्यकर्त्या व लेखिका छाया दातार म्हणतात, "पुरूषी वर्चस्व हा एका व्यवस्थेचा भाग आहे हे लक्षात आल्यावर त्याच्याविरूद्ध संघटित लढा द्यायला हवा. म्हणजेच 'खाजगी'तील प्रश्नांची, कुटुंबसंस्थेच्या अंतर्गत प्रश्नांची जाहीर चर्चा करायला हवी."[1] दातार यांच्या मते स्त्रियांनी कुठलेही अन्याय सहन न करता आपल्या गंभीर प्रश्नांना वाचा फोडली पाहिजे, असे ते सूचित करताना दिसतात.

चळवळीच्या माध्यमातून आणि शिक्षणाच्या प्रभावातून बऱ्याच स्त्रिया आता पुढे येऊन पुरूषांच्या खांद्याला खांदा लावून काम करताना दिसताहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मनुवादी संस्कृती व पुरूषसत्ता संस्कृतीच्या विरूद्ध होते. त्यांनी देखील स्त्रियांना जागृत करण्याचा प्रयत्न केला आहे. स्त्री ही स्वावलंबी व्हावी. शिक्षणात मुलांना पुढे करावे व पुरूषांची मक्तेदारी संपवावी यासाठी ते आग्रही होते. या संदर्भात बा.ह.कल्याणकर यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार मांडले आहेत, ते म्हणतात, "स्त्रियांनी आपल्या मुलांना शिक्षण देण्याचा आग्रह धरावा. ज्ञान व विद्या ही काही पुरूषांची मक्तेदारी नाही. ते स्त्रियांनाही आवश्यक आहे. स्त्रियांनी निर्भयतेने जगण्यास शिकले पाहिजे, मुलीचे लहान वयात लग्न करून तिच्या जीवनाचे मातेरे करू नका असे ते सांगत."[2] या विचारातून स्त्रियांच्या उद्धाराविषयी डॉ. आंबेडकरांना किती तळमळ होती हे सूचित होते.

औद्योगिकीकरण, जागतिकीकरण, वाढती महागाई व संगणकाचा वापर यामुळे बेकारीचे प्रमाणही तेवढेच वाढले आहे. पदव्या घेऊन बाहेर पडताहेत परंतु तेवढ्या संस्थेत नोकरी मिळण्याचे प्रमाण अल्प आहे. मुलं वयाने मोठी होऊ लागली आहेत. बेकारीचा भस्मासुर वाढतो

आहे. लाखो इंजिनीअर्स, डॉक्टर्स बाहेर पडत आहेत. स्पर्धा परीक्षेत असंख्य विद्यार्थी बसताहेत तेवढेच मुलींचे प्रमाण आहे. नोकरी नसल्यामुळे विवाहाच्या समस्याही वाढल्या आहेत. काही घरांमध्ये पुरूष प्रधान संस्कृती म्हणजे महिलांना नोकरीची गरज नाही. तिने घराबाहेर पडू नये. पुरूषानेच नोकरी करावी. स्त्रिया नोकरी करण्यास असमर्थ असतात असेही मागास विचाराची माणसं वावरताना दिसतात. या ठिकाणी पुरूषसत्ताक संस्कृतीच्या प्रभावामुळे सुशिक्षित स्त्रियांची मुस्कटदावी होताना दिसते.

सरकारी नोकऱ्या जवळपास संपण्यासारखे किंवा अशक्यप्राय असल्यामुळे आता तरूण महिलांना खाजगी कंपनीत नोकरीच्या निमित्ताने बाहेर पडणे गरजेचे आहे. तिला इच्छा असो वा नसो नोकरी करावी लागते. आता पुरूषांच्या बरोबरीने स्त्रियांचेही शिक्षण वाढले आहे. अशावेळी तिला पुरूष मंडळीची घरातल्या ज्येष्ठ व्यक्तींची मदतीसाठी गरज भासत असते. तिचे लहान मुल असेल तर तिच्या सासूने त्याला सांभाळावे अशी अपेक्षा असते. मुलगा-सून नोकरीला गेल्यानंतर ज्येष्ठ माणसं लहान मुलांसह घर सांभाळतात (अपवादात्मक ठिकाणी) नाही तर अलीकडे पाळणा घरे उपलब्ध असतातच. अशावेळी जिथे फक्त नवरा आणि बायको अशा दोनच व्यक्ती असतील तर तिथे मात्र नोकरीवरून घरी आल्यानंतर चिडचिड होणे या गोष्टी स्वाभाविक असतात तर अशावेळी पुरूषाने आपले वर्चस्व न गाजवता आपल्या सहचारिणीच्या भावना, कष्ट, मन जाणून घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे अशी अपेक्षा असते. तिथे त्याने पुरूषी वर्चस्व दाखविता कामा नये.

स्त्री आणि पुरूष यांच्या लिंगभावासंदर्भात विचार केला तर नेहमी पारंपरिक असा विचार केला जातो की स्त्री श्रेष्ठ की पुरूष श्रेष्ठ. खऱ्या अर्थाने हा विचार करणेच चुकीचे आहे. यात पुरूषानेही आपण खूप वेगळे आहोत हे समजू नये. समाजात सार्वजनिक ठिकाणी वावरताना त्याने श्रेष्ठ-कनिष्ठतेचा भाव आपल्या मनात ठेवू नये अशी अपेक्षा असते. भारतीय स्त्रीने या पुरूषांच्या भावना लक्षात घेऊन तिने संघटित होण्याचा प्रयत्न केला पाहिजे. आजही काही स्त्रिया चौकटीच्या बाहेर पडायला तयार नाहीत ही बाजूही लक्षात घ्यायला हवी. या संदर्भात डॉ. वंदना महाजन म्हणतात, "भारतीय स्त्रिया जात, धर्म, वर्ग आणि वर्ण यात वाटल्या गेल्या आहेत. यामुळे या स्त्रियांचे प्रभावी संघटन निर्माण होऊ शकलेले नाही. एक माणूस म्हणून आपल्या अधिकारांची प्रभावी जाणीव बोटावर मोजण्याइतपत स्त्रिया सोडल्या तर इतर भारतीय स्त्रियांना झालीच नाही, असे खेदाने म्हणावे लागते."[3] डॉ. महाजन यांच्या मते स्त्रीने समाजव्यवस्थेत बाहेर पडून स्वत:ची अस्मिता जपून स्वबळावर संघटित व्हायला पाहिजे अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. पारंपरिक चौकटीच्या बाहेर पडण्याचा प्रयत्न स्त्रिया करताना दिसत नाही याविषयी खेद व्यक्त केला आहे.

अलीकडे स्त्री ही स्वतंत्र विचाराची झाली आहे, उच्चशिक्षित आहे. ती विवाह, शिक्षण याबाबतीत स्वत: निर्णय घेऊ शकते. परंतु बऱ्याच ठिकाणी तिच्या करिअरला पुढील शिक्षणाला अडसर ठरण्याचा प्रयत्न जुन्या विचारांच्या पुरूषांकडून होताना दिसतो. त्यामुळे तिच्या महत्त्वाकांक्षा पूर्ण होऊ शकत नाही. इथे पुरूषसत्ता संस्कृती तिच्या विकासासाठी अडसर ठरत

असतात ही बाब लक्षात घ्यायला हवी. काही तिचे स्वत:चे निर्णय असतात ते "स्त्री शिक्षण, आधुनिक जगातील वावरामुळे तिच्या जाणिवा पुरूषांपेक्षा अधिक प्रगल्भ झालेल्या दिसतात. पुरूषाला मात्र याची कल्पना असूनही तो बदलायला तयार नाही, त्याची मानसिकता, वैचारिकता यात बदल करायला तो तयार नाही असेच जाणवते." एकूणच स्त्रियांच्या सबलीकरणासाठी पुरूषांची वैचारिकता व मानसिकता बदलण्याची नितांत गरज असल्याचे कुलकर्णी यांनी लक्षात आणून दिले आहे. यादृष्टीने स्त्री आणि पुरूष यांचे संबंध निकोप असले तर स्त्री निर्भयपणे वावरू शकते. पुरूषप्रधान संस्कृतीनेही लिंगभेद न करता आधुनिक पुरोगामी विचारातून, फुलेआणि आंबेडकर यांच्या स्त्रीउद्धाराच्या विचारांना प्राधान्य देऊन, परीवर्तनवादी/समानतेची भूमिका स्वीकारून आपल्या मानसिकतेत बदल घडवून आणणे तितकेच महत्त्वाचे वाटते.

**निष्कर्ष**

1. स्त्री शिक्षित झालेली असली तरी पुरूषसत्ता संस्कृती तिच्या विकासाला अडसर आणणारी दिसून येते
2. सामाजिक, शैक्षणिक, राजकीय व आर्थिक क्षेत्रात स्त्रियांना आपलं स्वतंत्र स्थान निर्माण केलेलं आहे.
3. स्त्रियांनी संघटित होणे ही काळाची गरज असल्याचे लक्षात येते.
4. पुरूषसत्ताक संस्कृतीच्या प्रभावामुळे सुशिक्षित स्त्रियांची मुस्कटदाबी होताना दिसते.
5. स्त्री आणि पुरूष असा लिंगभेद न मानता समानतेच्या तत्त्वाचा पुरूषांनी स्वीकार करणे गरजेचे आहे.
6. स्त्री सबलीकरणासाठी फुले-आंबेडकर यांच्या स्त्रीउद्धाराची भूमिका समर्थनीय ठरते.

**संदर्भ ग्रंथ**

1. दातार छाया, 'स्त्री-पुरूष', ग्रंथाली प्रकाशन, मुंबई, द्‌वितीय आवृत्ती 1988, पृ. 137.
2. कल्याणकर बा.ह., 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे सामाजिक पुनर्रचनेचे विचार', अरूणा सबाने संपा. 'डॉ. आंबेडकर आणि स्त्री', आकांक्षा प्रकाशन, नागपूर, प्रथमावृत्ती 2007, पृ. 103.
3. महाजन, डॉ. वंदना, 'स्त्रीवाद आणि समाज परिवर्तन,' अथर्व पब्लिकेशन्स, जळगाव, प्रथमावृत्ती 27 फेब्रु. 2013, पृ. 31.
4. कुलकर्णी अंजली, 'स्त्री स्वत्वाचा शोध', आकांक्षा प्रकाशन, नागपूर, प्रथमावृत्ती 8 मार्च 2010, पृ. 42.